15 FEB 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत

# महाविद्यालयीन जीवनातच ध्येयनिश्चिती करा

## अभिनेते सयाजी शिंदे यांचा विद्यार्थ्यांना सल्ला : राष्ट्रीय युवा महोत्सवाची सांगता


प्रतिनिधी
कोल्हापूर

ध्येय पूर्तीसाठी प्रामाणिक प्रयत्न केले तर आयुष्यात चांगले यश मिळवता येईल. त्यासाठी युवकांनी महाविद्यालयीन जीवनातच आयुष्यातील ध्येय निश्चित करा, असा सल्ला प्रसिद्ध अभिनेते सयाजी शिंदे यांनी विद्यार्थ्यांना दिला.

शिवाजी विद्यापीठात ३२ व्या राष्ट्रीय युवा महोत्सव १० ते १४ फेब्रुवारी या कालावधीत आयोजित करण्यात आला होता. या युवा महोत्सवाचा सांगता समारंभ आणि पारितोषिक वितरण मोठ्या उत्साहात लोक कला केंद्रात पार पडला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. जिल्हाधिकारी डॉ अमित सैनी यांनी प्रमुख उपस्थित होते. अध्यक्षस्थानी प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे होते.

अभिनेते सयाजी शिंदे म्हणाले, महाविद्यालयात असतानाच करिअर कोणत्या क्षेत्रात करायचे हे युवकांनी ठरवले पाहिजे. ध्येय निश्चित करून ध्येयप्राप्तीसाठी प्रयत्न केले पाहिजेत. आकाश खूप मोठं आहे ध्येयापर्यंत पोचण्यासाठी आपल्या पंखात बळ असावे लागते. कोणावर अवलंबून करिअर न करता ध्येयापर्यंत पोहचण्याची इच्छाशक्ती मनात ठेऊन प्रयत्न केला तर आयुष्य घडवाल, असे ते म्हणाले, तसेच विद्यार्थ्यांशी संवाद साधत साधला.

जिल्हाधिकारी डॉ. सैनी म्हणाले, युवा महोत्सवातील आठवणी या कधीच विसरल्या जात नाहीत. युवा



कोल्हापूर : युवा महोत्सवाच्या समारोपावेळी मार्गदर्शन करताना अभिनेते सयाजी शिंदे.

महोत्सव पाहण्यासाठी मी माझ्या कुटुंबियांसोबत यायला पाहिजे होते, असे मतही त्यांनी व्यक्त केले. भारतीय विद्यापीठ महासंघाचे निरीक्षक प्रा. एस.के. शर्मा, तेजपूर विद्यापीठाचे संघ व्यवस्थापक भूपाली कश्यब, मुंबई विद्यापीठाचे नीलेश सावेकर यांनी महोत्सवाच्या संयोजनाबद्दल समाधान व्यक्त केले.

प्रभारी कुलगुरू डॉ डी आर मोरे यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. यावेळी कुलसचिव डॉ विलास नांदवडेकर, विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. डी के गायकवाड, भारतीय विद्यापीठ महासंघाचे सहसचिव डॉ. डेव्हीड सॅम्पसन, परीक्षक प्रा. एस. के. शर्मा, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, वित्त आणि लेख अधिकारी अजित चौगुले, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे आदी उपस्थित होते.

15 FEB 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Times of India

# Mumbai University bags top honours

Pics: Arjun Takalkar

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Mumbai University bagged the top slot at the closing ceremony of 32nd all India inter-university youth festival, Shivotsav-2017, organised by the Shivaji University, Kolhapur (SUK).

The second position was grabbed by Rashtrasant Tukdoji Maharaj Nagpur University. The third and the fourth position was awarded to Gurunanak Dev University and Lovely professional University of Punjab.

Actor Sayaji Shinde and district collector Amit Saini was invited as guests for the price distribution ceremony. Shinde who is a famous multilingual actor interacted with the students and answered their queries on different aspects of acting. The acting vice chancellor of SUK, D R More, said, "It was heart warming to see huge participation in these events. Around 79 universities and around 1,500 students participated in the festival."

Shinde inspired the crowd with the hard work and fame he has acquired in these years. He said, "I had only 20 paise when I left for Mumbai. I knew i had to be someone in the city of dreams-Mumbai. There are many students who aspire to become an artist, an actor in college and many do not pursue that career. But, I took my dreams seriously and started my career as a watchman while I was studying at college. I entered the film industry when i was in my 30s. It took me a decade to feel that i was succeeding in my career."

He added, "Youngsters like you should decide what you want to pursue in life. You must not share your goals with everyone but silently make efforts to achieve it. You must be prepared to represent your country internationally."

The district collector, Amit Saini, said, This festival has exhibited bundle of talent in students. Therefore, students must work hard to nurture their skills. Passion and skill must be with oneself for a lifetime. It must not be lost midway."






Above: The general champions celebrate their win, Right: A student adds final touches to a rangoli design










कोल्हापूर : गेले चार दिवस शिवाजी विद्यापीठ येथे सुरु असलेल्या ३२ व्या राष्ट्रीय युवा महोत्सवाची मोठ्या उत्साहात सांगता झाली. यावेळी महोत्सवात सादर झालेल्या २६ कलाप्रकारांचा निकाल जाहीर करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ अभिनेते सयाजी शिंदे यांच्या हस्ते विजेत्या संघाना बक्षीस देऊन गौरवण्यात आले. याप्रसंगी डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. डी. आर. मोरे, डॉ. अभयकुमार साळुंखे, महेश काकडे, एस. के. शर्मा, अजित चौगुले, डॉ. डी. के. गायकवाड आदी प्रमुख उपस्थित होते. विजेते संघ अनुक्रमे १) विजेतेपद मिळवलेला मुंबई विद्यापीठाचा संघ. २) उपविजेता संघ राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ ३) तिसरा क्रमांक गुरूनानक देव अमृतसर विद्यापीठ ४) चौथ्या क्रमांकाचे बक्षीस स्वीकारताना लव्हली प्रोफेशनल विद्यापीठ पंजाबचे विद्यार्थी.






कोल्हापूर : युवा महोत्सवाच्या समारोप कार्यक्रमात अभिनेते सयाजी शिंदे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले यावेळी तरुणांनी मोठी गर्दी केली होती. (सर्व छाया : इम्रान गंवडी)

15 FEB 2017

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राष्ट्रीय युवा महोत्सवाचे विजेतेपद मुंबई विद्यापीठाकडे

## अभिनेते सयाजी शिंदे यांच्या हस्ते बक्षीस वितरण : उपविजेतेपदी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणात गेल्या १० फेब्रुवारीपासून रंगलेल्या ३२ व्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ राष्ट्रीय युवा महोत्सवाचे मुंबई विद्यापीठाने सर्वसाधारण विजेतेपद, तर नागपूरच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाने उपविजेतेपद पटकावून महोत्सवावर महाराष्ट्राची मोहोर उमटवली. अमृतसरच्या गुरूनानक देव विद्यापीठाने तृतीय तर पंजाबच्या लव्हली प्रोफेशनल विद्यापीठाने चतुर्थ क्रमांक पटकावला.

प्रसिद्ध अभिनेते सयाजी शिंदे यांच्या हस्ते व जिल्हाधिकारी डॉ. अमित सैनी यांच्या प्रमुख उपस्थितीत पुरस्कार वितरण करण्यात आले. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. डी.आर .मोरे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. आर.व्ही. गुरव, भारतीय विद्यापीठ महासंघाचे सहसचिव डॉ. डेव्हीड सॅम्पसन, निरीक्षक डॉ. एस.के. शर्मा आदी उपस्थित होते.

शोभायात्रेमध्ये आंध्र प्रदेशच्या कृष्णा विद्यापीठाचा प्रथम, आसामच्या गुवाहाटी विद्यापीठाचा द्वितिय तर कुरूक्षेत्र विद्यापीठाचा तृतीय क्रमांक आला. कोल्हापूरचे शिवाजी विद्यापीठ आणि कर्नाटकचे मैसूर विद्यापीठ यांना चतुर्थ क्रमांक विभागून देण्यात आला.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ येथे राष्ट्रीय युवा महोत्सवाच्या निकालानंतर गुवाहाटी विद्यापीठ आसामच्या विद्यार्थ्यांनी केलेला जल्लोष.**

### शिवाजी विद्यापीठाचे यश

शिवाजी विद्यापीठाने शोभायात्रेत चतुर्थ क्रमांकासह सहभाग नोंदविलेल्या स्पॉट फोटोग्राफी व मूकाभिनय या दोन्ही प्रकारांत अनुक्रमे प्रथम व चतुर्थ क्रमांक पटकावला. बक्षीस वितरणप्रसंगी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी एकच जल्लोष केला.

### विजेत्या स्पर्धकांचा ढोल-ताशाच्या तालावर जल्लोष

राष्ट्रीय युवा महोत्सवाच्या निकालानंतर विजेत्या स्पर्धकांनी ढोल ताशांच्या तालावर आपआपल्या प्रदेशातील नृत्यकला सादर केली. पंजाब विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेला भांगडा अधिक लक्षवेधी ठरला. तसेच विद्यार्थ्यांनी एकमेकाची गळा भेट घेत आनंद व्यक्त केला.

### युवा महोत्सवातील गटनिहाय अनुक्रमे विजेते, उपविजेते विद्यापीठ

**संगीत :** गुरुनानक देव विद्यापीठ, अमृतसर. मुंबई विद्यापीठ, मुंबई

**नृत्य :** मणिपूर विद्यापीठ, मणिपूर. कुरूक्षेत्र विद्यापीठ, ठाणेसर, हरयाणा

**साहित्य :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर. गुवाहाटी विद्यापीठ, आसाम

**नाट्य :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद. एसएनडीटी महिला विद्यापीठ, मुंबई

**ललितकला :** मुंबई विद्यापीठ, मुंबई. गुलबर्गा विद्यापीठ, कर्नाटक

### मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी केले छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन

राष्ट्रीय युवा महोत्सवाचा निकाल जाहिर झाल्यानंतर विजेतेपदी असलेल्या मुंबई विद्यापीठ, मुंबईच्या विद्यार्थ्यांनी मुख्य इमारतीसमोरच्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन करून, आनंद व्यक्त केला. तसेच छत्रपती शिवाजी महाराज व राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या भूमीत आपल्याला कला सादरीकरणाची संधी मिळाली. त्याचबरोबर विद्यार्थ्यांनी मोठ्या कष्टाने सादर केलेल्या कलाप्रकारांना न्यायही मिळाला, अशी भावना मुंबई विद्यापीठाचे सांस्कृतिक समन्वयक निलेश सावे यांनी व्यक्त केली.

15 FEB 2017

# झारखंडमध्ये डमकच, झुमर विशेष लोकप्रिय

## विद्यार्थ्यांनी उलगडले लोककलेचे विविध पैलू

प्रिया जाधव
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या ३२ व्या युवा महोत्सवात सोमवारी विविध स्पर्धा पार पडल्या. यामध्ये झारखंडच्या सहभागी स्पर्धकांनी 'तरुण भारत'शी संवाद साधतांना आपल्या राज्याच्या संस्कृतीचे, विशेषत: लोककलेचे अनेक पैलू उलगडले.

झारखंड राज्यात आदिवासी जमातींचे वास्तव्य आहे. येथे साधारण १५० जमाती आहेत. यामध्ये प्रामुख्याने मुंडा, संथाळी, ऊरांव या जमातींची लोकसंख्या अधिक आहे. मात्र झारखंड राज्यात अस्तित्वात असणारी एकमेव असूर ही जमात मात्र लुप्त होत आहे.

आदिवासी संस्कृतीमध्ये त्यांचे सण, उत्सव हे पूर्णत: जंगलात साजरे केले जातात. यामध्ये डमकच, झुमर, छंऊ, पाईका असे अनेक नृत्यप्रकार सादर करून ते आनंदोत्सव साजरा करतात. डमकच नृत्यावेळी सर्वजण एकमेकांचे हात धरून गोल फिरत साखळी करतात. शेतीची कामे सुरू करण्यापूर्वी अन्नधान्य मोठ्या प्रमाणात पिकू दे, केलेल्या कामाला यश मिळू दे, अशी प्रार्थना करत पुरूष, स्त्रिया, लहान मुले या नृत्यात सहभागी होतात. तर युद्धाला जाताना येथील पुरूष पाईका हे मर्दानी नृत्य करतात.

जंगलात लाकूड, बांबू पासून व्यासपीठ बांधून त्यावर झुमर हा नृत्य प्रकार सादर केला जातो. तर काही वेळा कर्मा नावाचे झाड घराच्या अंगणात आणून त्याची पूजा करताना देखील झुमर नृत्य केले जाते. यावेळी धोती, सफेद बंडी, डोक्याला गमची (पगडी) असा पेहराव केला जातो. या गमचीमध्ये पुरूष मोरपंख खोवतात, तर स्त्रिया बगळ्याचे पिस खोवतात. स्त्री–पुरूष दोघेही हातात–पायात पैरी हे आभूषण घालतात.

आनंदोत्सवात वापरण्यात येणारी झारखंडची वाद्ये लक्ष वेधून घेणारी आहेत. यामध्ये मांदर, नगाडा, भेर यांचा समावेश होतो. मांदरचा वापर सर्वाधिक होतो. ते माती, गवत, अन् चामड्यापासून बनवले जाते. मोठ्या आकाराच्या ढोलकीसारख्या दिसणाऱ्या या वाद्याच्या आवाजात नृत्य करणारे आनंदाने बेहोष होतात, असे त्यांनी सांगितले. या वाद्याचा आवाज इतर वाद्यांच्या तुलनेत मोठा येतो.

युद्धाला जाण्यापूर्वी मोठे पिपाणीसदृश, लांबट आकाराचे भेर हे वाद्य वाजवले जाते. हे वाद्य सध्या दुर्मिळ होत चालले आहे. याच महोत्सवा दरम्यान सुग्रास भोजनाचा देखील बेत आखला जातो. यामध्ये तांदळापासून बनविलेली मिठी रोटी, ढूसका, पिठ्ठा, लिठ्ठी चोखा यांचा प्रामुख्याने समावेश असतो.

### मिसळ, वडापाव आणि कोल्हापुरी चप्पल

रांची विद्यापीठातील मुलांनी आपल्या कोल्हापूर वास्तव्याबद्दल मत व्यक्त केले. या समुहातील अनेक विद्यार्थी प्रथमच कोल्हापूरला आले आहेत. मोकळ्या वेळात कोल्हापूर शहरात फेरफटका मारताना त्यांनी कोल्हापुरी मिसळ, वडापाव, पाणीपुरीचा आस्वाद घेतल्याचे सांगितले. विद्यापीठ परिसरात अगदी जवळून मोर पाहण्याचा आनंद घेता आल्याचेही या विद्यार्थिनींनी सांगितले. कोल्हापुरचे वैशिष्ट्य कोल्हापुरी चप्पल खरेदी केल्याचे सांगितले.

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'घुमर', 'चरिया'तून राजस्थानचा नृत्याविष्कार

## राष्ट्रीय युवा महोत्सव : राजस्थानमध्ये देवी जगदंबेच्या पूजेवेळी केले जाते नृत्य

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

राजस्थानमध्ये घुमर, चरिया आणि कालबेलिया ही पारंपरिक लोकनृत्य प्रसिद्ध आहेत. या लोकनृत्यांच्या माध्यमातून राजस्थानच्या लोकजीवनाचे प्रतिबिंब पडते. हिंदी चित्रपटात गल्ला भरण्यासाठीही या लोकनृत्याचा वापर केला जातो. शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या राष्ट्रीय युवा महोत्सवाच्या निमित्ताने राजस्थानी लोकनृत्याचा अविष्कार सादर झाला आणि त्यातून तेथील ग्रामीण लोकजीवनाचे दर्शन देशभरातून आलेल्या युवापिढीला झाले. देशातील सर्व संस्कृतींना एकत्रित आणणाऱ्या या युवा महोत्सवात राजस्थानी गाणी, नृत्य भाव खाऊन गेला.

रजपुतांच्या पत्नींना 'ठकुरायन' म्हणतात. ठकुरायन हा शब्द आजवर आपण हिंदी चित्रपटात अनेकवेळा ऐकला आहे. या ठकुरायन घागरा परिधान करून 'ओह मारी घुमर नखरेवाली' या लोकगीताच्या ठेक्यावर 'घुमर' लोकनृत्य करतात. सर्वसामान्य महिला 'चुनरी गढा दे महारी पायलडी' या गीतावर 'चरिया' नृत्य, तर 'आरे आरे आह कालव कुद पडो मेला मे' या गीतावर 'कालबेलिया' नृत्य सादर केले जाते. राजस्थानी परंपरेतील 'दालबाजी चुर्मा' हा खाद्यपदार्थ देशभर प्रसिद्ध असून आलेल्या पाहुण्याचा पाहुणचार करण्यासाठी हा पदार्थ खाऊ घातला जातो.

राजस्थानच्या पारंपरिक नृत्य, खाद्य संस्कृती, गीते यांची देशभर वेगळी ओळख आहे. राजस्थानी लोक मोठ्या श्रध्देने देवीआई जगदंबेची पूजा करतात. देवीच्या पुजेवेळी नगाडा, मंजिरे, या वाद्यांच्या तालावर पायात–हातात घुंगरू बांधून राजस्थानी लोक 'घुमर' व 'चरिया' नृत्य करीत असतात. राजस्थानी पेहरावात डोक्यावर मातीच्या घागरींचा थरावर अग्नि लावून 'चरिया' नृत्य करतात. तर तरुण–तरुणी तलवार–वाटी, परातीवरतीच्या काटावर नाचतात. राजस्थानमध्ये गणगवर, झाकीया, देवीआईची पुजा हे पारंपरिक सण मोठ्या उत्साहात साजरे केले जातात. या सणाच्यावेळी महिला दिवसभर उपवास करतात. सायंकाळी गोडधोड खाऊन उपवास सोडतात. तसेच राजस्थानी कचोरी, कडी कचोरी, मिर्चीवडा आदी पदार्थ प्रसिद्ध आहेत.

### आप्पाजी मेळा

बनस्थली विद्यापीठ राजस्थानची खासीयत म्हणजे आप्पाजीचा मेळा. अप्पाजी हे विद्यापीठाचे संस्थापक असून त्यांच्या स्मृतींची आठवण म्हणून 'आप्पाजी मेळा' विद्यापीठ परिसरात आयोजित केला जातो.




कोल्हापूर : राजस्थानी 'घुमर', 'चिरीया' लोकनृत्य सादर करताना बनस्थली विद्यापीठाच्या विद्यार्थिनी.

### राजस्थानी चमूत महाराष्ट्राची कन्या

बनस्थली विद्यापीठ राजस्थानच्या विद्यार्थी कलाकारांच्या चमूत महाराष्ट्रीयन कन्या प्रशस्ती जावखेडकर हिचा सहभाग होता. जवळपास सर्वच कलाप्रकारामध्ये तिचा सहभागी राहीला. 'स्किट' स्पर्धेत तिने केलेल्या मुख्य भूमिकेने प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले. तिच्याशी संवाद साधला असता राजस्थानी पारंपरिक लोकनृत्याची ओळख झाली.

जल्लोषात 'शिवोत्सव'चा समारोप : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाला उपविजेतेपद

# 'मुंबई'ला सर्वसाधारण विजेतेपद

कोल्हापूर : कलाप्रकारांच्या दमदार सादरीकरणाच्या जोरावर मुंबई विद्यापीठाने ३२ व्या आंतरविद्यापीठीय राष्ट्रीय 'शिवोत्सव' युवा महोत्सवाचे सर्वसाधारण विजेतेपद मंगळवारी पटकाविले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ उपविजेते ठरले. यजमान शिवाजी विद्यापीठाला शोभायात्रेतील उत्कृष्ट सादरीकरणाबाबत चौथा क्रमांक मिळाला. विविध कलाप्रकारांत महाराष्ट्रातील विद्यापीठांनी यश मिळवत बाजी मारली. गेल्या पाच दिवसांपासून शिवाजी विद्यापीठात रंगलेल्या, तरुणाईच्या कलाविष्काराने बहरलेल्या युवा महोत्सवाचा जल्लोषी वातावरणात समारोप झाला.

विद्यापीठाच्या लोककला केंद्रातील समारोपाच्या कार्यक्रमात अभिनेते सयाजी शिंदे, जिल्हाधिकारी डॉ. अमित सैनी यांच्या हस्ते विजेत्या संघांना चषक देऊन सन्मानित करण्यात आले. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. डी. आर. मोरे, ता भारतीय विद्यापीठ महासंघाचे (एआययु) महोत्सव निरीक्षक एस. के. शर्मा, सहसचिव डेव्हिड सॅम्पसन, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. अभयकुमार साळुंखे, भारती विद्यापीठाचे हणमंतराव कदम प्रमुख उपस्थित होते.

यावेळी निरीक्षक शर्मा म्हणाले, 'कलानगरी' कोल्हापुरात कला सादरीकरणाचे देशभरातील तरुणाईला भाग्य लाभले. महोत्सवातील निकालात मानांकन पद्धती लागू करण्याचा प्रस्ताव 'एआययु'ला सादर करणार आहे. कार्यक्रमात तेजपूर विद्यापीठाच्या भूपाली कश्यप, मुंबई विद्यापीठाचे नीलेश साधे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, ग्रंथपाल डॉ. नमिता खोत, क्रीडा विभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, आदी उपस्थित होते.

कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी स्वागत केले. विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी प्रास्ताविक केले. राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड यांनी निकाल वाचन केले. दरम्यान, महोत्सवातील सर्वसाधारण विजेतेपदाच्या गटात अमृतसरची गुरुनानक युनिव्हर्सिटी तृतीय, तर पंजाबची लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटीने चौथा क्रमांक मिळविला. शोभायात्रेत आंध्र प्रदेशच्या कृष्णा युनिव्हर्सिटीने प्रथम, आसामच्या गुवाहटी युनिव्हर्सिटीने द्वितीय, हरियाणाच्या कुरुक्षेत्र विद्यापीठाने तृतीय क्रमांक मिळविला. यजमान शिवाजी विद्यापीठ आणि युनिव्हर्सिटी ऑफ म्हैसूरला चौथा क्रमांक विभागून दिला. विजेत्या संघातील कलाकारांनी लोककला केंद्राच्या परिसरात नृत्याचा फेर धरत जल्लोष केला. काहींनी विजेतेपदासमवेत 'सेल्फी' घेत आनंद साजरा केला. (प्रतिनिधी)

## कलाप्रकारनिहाय विजेतेपद

संगीत (अनुक्रमे विजेते, उपविजेते) : गुरु नानक देव युनिव्हर्सिटी, मुंबई विद्यापीठ. नृत्य : मणिपूर युनिव्हर्सिटी, कुरुक्षेत्र विद्यापीठ. साहित्य : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, गुवाहटी युनिव्हर्सिटी. नाट्य : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद, एसएनडीटी महिला विद्यापीठ मुंबई. ललित कला : मुंबई विद्यापीठ, गुलबर्गा युनिव्हर्सिटी कर्नाटक.

## महाराष्ट्रातील विद्यापीठांची बाजी

महोत्सवामध्ये महाराष्ट्रातील विद्यापीठांनी विविध कलाप्रकारांत यश मिळवत बाजी मारली. त्यात भारती विद्यापीठ (शास्त्रीय गायन एकल, तालवाद्य व सुगम गायन प्रथम), मुंबई विद्यापीठ (शास्त्रीय गायन, लोकवाद्यवृंद, कोलाज व पोस्टर मेकिंग प्रथम, तालवाद्य, पाश्चिमात्य गायन, पाश्चिमात्य समूहगीत द्वितीय, एकांकिका व व्यंगचित्रे तृतीय), संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ (शास्त्रीय गायन एकल द्वितीय, एकांकिका, नक्कला व व्यंगचित्र चतुर्थ), स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड (सुरवाद्य, तालवाद्य द्वितीय), एसएनडीटी महिला विद्यापीठ (सुगम गायन, भारतीय समूहगीत गायन प्रथम, पाश्चिमात्य समूहगीत व मातीकाम तृतीय, एकांकिका चतुर्थ, मूकनाट्य द्वितीय), डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद (सुगम गायन, लघुनाटिका, नक्कला व मातीकाम द्वितीय), राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ (पाश्चिमात्य गायन, लोकवाद्यवृंद तृतीय, भारतीय समूहगीत, पाश्चिमात्य समूहगीत, कोलाज, लोकनृत्य, वक्तृत्व व वाद-विवाद द्वितीय, शास्त्रीय नृत्य चतुर्थ, मातीकाम प्रथम), शिवाजी विद्यापीठ (मूकनाट्य चतुर्थ, स्थळ छायाचित्रण प्रथम), सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ (स्थळचित्रण चतुर्थ), सोलापूर विद्यापीठ (पोस्टर मेकिंग तृतीय, मांडणी द्वितीय).

आमचे विद्यापीठ दरवर्षी राष्ट्रीय युवा महोत्सवात सहभागी असते. यावेळी पहिल्यांदाच संघाला उपविजेतेपद मिळाले. विद्यार्थी, मार्गदर्शकांची मेहनत, समन्वयामुळे यश मिळाले. महोत्सवात १५ कलाप्रकारांत सादरीकरण केले. यातील १० प्रकारांत यशस्वी ठरलो.

- **प्रकाश शुक्ला**, संघव्यवस्थापक, नागपूर विद्यापीठ



महोत्सवात बक्षिसे मिळालेल्या पंजाब विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी नृत्य करत आनंद साजरा केला.




महोत्सवातील शोभायात्रेच्या सादरीकरणात चौथा क्रमांक मिळविणाऱ्या यजमान शिवाजी विद्यापीठाच्या संघाला अभिनेते सयाजी शिंदे यांच्या हस्ते चषक देऊन गौरविण्यात आले. यावेळी डावीकडून एम. एल. होनगेकर, भास्कर ताह्मणकर, पी. टी. गायकवाड, आर. व्ही. गुरव, प्राचार्य अभयकुमार साळुंखे, प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, आदी उपस्थित होते.

या राष्ट्रीय युवा महोत्सवाच्या ३२ वर्षांत मुंबई विद्यापीठाचे यंदाचे १७ वे विजेतेपद आहे. 'शिवोत्सव'मध्ये ११ कलाप्रकारांत आमच्या संघाने सादरीकरण केले. त्यातील ९ प्रकारांत यश मिळाले आहे. ५५ गुणांसह आम्ही सर्वसाधारण विजेतेपद पटकाविले. संघातील विद्यार्थी, मार्गदर्शक व संघव्यवस्थापकांचे कष्ट यशासाठी महत्त्वाचे ठरले. - **नीलेश सावे, सांस्कृतिक समन्वयक, मुंबई विद्यापीठ**



# क्षणचित्रे




कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठात मंगळवारी जल्लोषी वातावरणात 'शिवोत्सव' या ३२ व्या आंतरविद्यापीठीय राष्ट्रीय युवा महोत्सवाचा समारोप झाला. समारोपाच्या कार्यक्रमात राजस्थानच्या बनस्थली युनिव्हर्सिटीच्या संघाने बहारदार लोकनृत्य सादर केले. (सर्व छाया : आदित्य वेल्हाळ)





कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठात मंगळवारी जल्लोषी वातावरणात 'शिवोत्सव' या ३२ व्या आंतरविद्यापीठीय राष्ट्रीय युवा महोत्सवाचा समारोप झाला. महोत्सवातील सर्वसाधारण विजेतेपद पटकाविणाऱ्या मुंबई विद्यापीठाच्या संघाला अभिनेते सयाजी शिंदे यांच्या हस्ते चषक देऊन गौरविण्यात आले. यावेळी डावीकडून सुलक्षणा कुलकर्णी, प्रतिमा जाधव, व्ही. एम. पाटील, एम. एल. होनगेकर, प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, बी. एन. पवार, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, भारती विद्यापीठाचे हणमंतराव कदम, एस. आर. पाटील, भारतीय विद्यापीठ महासंघाचे महोत्सव निरीक्षक एस. के. शर्मा, डॉ. नमिता खोत, आदी उपस्थित होते. दुसऱ्या छायाचित्रात उपविजेतेपद पटकाविणाऱ्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या संघाला चषक देऊन गौरविण्यात आले.


# स्पर्धा स्वत:शी करा, दुसऱ्याशी नको

## सयाजी शिंदे; 'शिवोत्सव'च्या समारोपप्रसंगी साधला तरुणाईशी संवाद

कोल्हापूर : कोणत्याही क्षेत्रात यश मिळविण्यासाठी स्पर्धा स्वत:शी करा, दुसऱ्याशी नको. खोट्याचा आधार घेऊ नका, नेहमी खरे राहा, असा सल्ला अभिनेते सयाजी शिंदे यांनी मंगळवारी येथे तरुणाईला दिला. शिवाजी विद्यापीठातील 'शिवोत्सव' या ३२ व्या आंतरविद्यापीठीय राष्ट्रीय युवा महोत्सवाच्या समारोपप्रसंगी त्यांनी मराठी, हिंदी आणि तेलगू भाषेत देशभरातील तरुणाईशी मनमोकळा संवाद साधला.

अभिनेते शिंदे म्हणाले, महाविद्यालयीन जीवन हे एक पायरी असून आयुष्याचा मंच खूप मोठा आहे. करिअर हे महाविद्यालयीन जीवनात पक्के करावे. दुसऱ्यावर अवलंबून राहिल्यास करिअर होणार नाही. अंगभूत कलागुण आणि इच्छाशक्तीच्या बळावर करिअर घडवा. कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी 'टॅलेंट'च उपयोगी ठरते. आयुष्यात कसे जगायचे ते ठरवा. ध्येय निश्चित करून ते साध्यण्याच्या दिशेने हळू-हळू वाटचाल करा. युवा महोत्सवात आता महाविद्यालयाचे प्रतिनिधीत्व करत आहात, देशाचे प्रतिनिधीत्व करण्याचे स्वप्न बाळगा.

अभिनेते शिंदे यांनी संवाद साधण्यापूर्वी लवली प्रोफेशनल युनिव्हर्सिटीच्या विद्यार्थ्यांनी पाश्चिमात्य समूहगीत, आय. के. गुजराल युनिव्हर्सिटीच्या गुरुप्रीत सिंग याने नकला सादर केल्या. राजस्थानच्या वनस्थळी युनिव्हर्सिटीच्या संघाने बहारदार लोकनृत्य, तर आंध्र प्रदेशच्या कृष्णा युनिव्हर्सिटीच्या विद्यार्थिनींनी लोकवाद्यवृंद सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. (प्रतिनिधी)



'युवोत्सव'च्या समारोपप्रसंगी अभिनेते सयाजी शिंदे यांनी तरुणाईशी मनमोकळा संवाद साधला.

### पुस्तकाने दाखविला करिअरचा मार्ग

एफ.वाय. ते टी.वाय. या कालावधीत वॉचमनची नोकरी करत असतानाच मी अभिनेता व्हायचे ठरविले आणि त्याच दिशेने वाटचाल केली. वयाच्या विसाव्या वर्षी धडपड सुरू केली तेव्हा कुठे चाळीसाव्या वर्षी यश लाभल्याचे त्यांनी सांगितले. दादरच्या फूटपाथवर 'अभिनय साधना' हे अवघ्या २२ रुपयांचे पुस्तक आपल्या करिअरला मार्ग दाखविणारे ठरल्याचे अभिनेते शिंदे यांनी सांगितले.

### 'टॅलेंट' कायम जवळ ठेवा

या महोत्सवातील तरुणाईच्या कला सादरीकरणाचा दर्जा उच्चतम असल्याचे दिसून आले. महोत्सवातून आठवणी घेऊन जा. आयुष्यात यशस्वी होण्यासाठी कायम आपल्याजवळ 'टॅलेंट' ठेवा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. अमित सैनी यांनी केले. प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे म्हणाले, आयुष्यात हा महोत्सव म्हणजे एक टप्पा आहे. तेवढ्यावरच समाधान न मानता पुढे वाटचाल करा.

# 'शिवोत्सव'चा समारोप...



कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठात मंगळवारी जल्लोषी वातावरणात 'शिवोत्सव' या ३२ व्या आंतरविद्यापीठीय राष्ट्रीय युवा महोत्सवाचा समारोप झाला. महोत्सवातील उपविजेतेपद पटकाविणाऱ्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या संघातील विद्यार्थी कलाकारांनी व्यासपीठावर नृत्याचा फेर धरत जल्लोष केला. या महोत्सवात मुंबई विद्यापीठाने सर्वसाधारण विजेतेपद पटकावले. -वृत्त/१०



आंध्र प्रदेशच्या कृष्णा युनिव्हर्सिटीच्या संघाने लोकवाद्यवृंदाचे सादरीकरण केले.

# मुंबई विद्यापीठ विजेते

## नागपूर विद्यापीठ उपविजेते; सयाजी शिंदे यांच्या हस्ते गौरव

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठात गेल्या चार दिवसांपासून सुरू असलेल्या ३२ व्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ राष्ट्रीय युवा महोत्सवाचे (शिवोत्सव) सर्वसाधारण विजेतेपद मुंबई विद्यापीठाने पटकावले. तर नागपूरच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाने उपविजेतेपद पटकावत महोत्सवावर महाराष्ट्राचा दबदबा राखला. शिवाजी विद्यापीठाने मिरवणुकीत चतुर्थ क्रमांक पटकावला.

विजेत्या संघाना अभिनेते सयाजी शिंदे यांच्या हस्ते जनरल चॅम्पियनशीप देऊन गौरविण्यात आले. जिल्हाधिकारी डॉ. अमित सैनी यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या सांगता समारंभाच्या अध्यक्षस्थानी प्रभागी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे होते. लोककला केंद्रात सांस्कृतिक कार्यक्रमाच्या सादरीकरणानंतर बक्षिस वितरण झाले.

मंगळवारी सकाळी पुन्हा विद्यार्थ्यांनी

**शिवोत्सव**

भारतीय संस्कृतीचे दर्शन घडवणारे नृत्य सादर करुन प्रेक्षकांची वाहव्वा मिळवली. पंजाबच्या लवली युनिर्व्हसिटीने पाश्चिमात्य संगीत पेश केले. त्यानंतर केरळच्या कृष्णा युनिर्व्हसिटीने अफलातून पारंपरिक वाद्यांचा गजर केला. पंजाबच्या एज्युकेशन ऑफ टेक्निकल इन्स्टिट्यूटच्या गुरुप्रितसिंहने मिमिक्रीच्या माध्यमातून मनोरंजन केले. त्यानंतर बक्षिस वितरण झाले. मुंबई विद्यापीठाला सर्वसाधारण विजेतेपद जाहीर होताच एकच जल्लोष झाला. त्यानंतर नागपुरच्या राष्ट्रसंत तुकडोजी विद्यापीठाला उपविजेतेपद जाहीर झाले. दोन्ही क्रमांक महाराष्ट्राच्या संघांनी पटकावल्यानंतर विद्यार्थ्यांच्या जल्लोषाने लोककला केंद्रच दणाणले. सर्वसाधारण गटात अमृतसरच्या गुरुनानक देव विद्यापीठाने तृतीय तर पंजाबच्या लव्हली प्रोफेशनल विद्यापीठाने चतुर्थ क्रमांक पटकावला.



शिवोत्सव विजेत्या मुंबई विद्यापीठ संघाला ट्रॉफी प्रदान करताना अभिनेते सयाजी शिंदे. व्यासपीठावर प्रभागी कुलगुरू डॉ. डी.आर. मोरे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, महेश काकडे, अजित चौगले, डॉ. हणमंतराव कदम, डॉ. एस. के. शर्मा, डॉ. नमिता खोत.

### शोभायात्रेतील विजेते

- **प्रथम** - कृष्णा विद्यापीठ, आंध्रप्रदेश
- **द्वितीय** - गुवाहाटी विद्यापीठ
- **तृतीय** - कुरुक्षेत्र विद्यापीठ
- **चतुर्थ विभागून** - शिवाजी विद्यापीठ व मैसूर विद्यापीठ

### शिवाजी विद्यापीठाची भरारी

मिरवणुकीच्या माध्यमातून शिवाजी विद्यापीठाने कोल्हापूर संस्कृतीचे दर्शन घडवले होते. नोटाबंदीनंतर भ्रष्टाचाराच्या भस्मासूराचा वध आणि पर्यावरण रक्षणाची हाक देणाऱ्या संस्कृती रथाने विषेश लक्ष वेधून घेतले होते. विद्यापीठाने वेगळेपण जपल्याने मिरवणुकीमध्ये चतुर्थ क्रमांक पटकावला. मुख्य स्पर्धेत स्पॉट फोटोग्राफीमध्ये प्रथम तर मूकाभिनयामध्ये चतुर्थ क्रमांक पटकावला.



मिरवणुकीमध्ये चतुर्थ क्रमांक पटकावलेल्या शिवाजी विद्यापीठ संघास बक्षीस देताना अभिनेते सयाजी शिंदे. व्यासपीठावर डीवीकडून डॉ. पी. टी. गायकवाड, डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. अभयकुमार साळुंखे, प्रभागी कुलगुरू डॉ. डी.आर. मोरे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, महेश काकडे, अजित चौगले.

### महोत्सवातील गटनिहाय विजेते व उपविजेते

- **संगीत :** गुरुनानक देव विद्यापीठ (अमृतसर), मुंबई विद्यापीठ (मुंबई)
- **नृत्य :** मणिपूर विद्यापीठ (मणिपूर), कुरुक्षेत्र विद्यापीठ (हरियाणा)
- **साहित्य :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ (नागपूर), गुवाहाटी विद्यापीठ (आसाम)
- **नाट्य :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ (औरंगाबाद), एसएनडीटी महिला विद्यापीठ (मुंबई)
- **ललितकला :** मुंबई विद्यापीठ (मुंबई), गुलबर्गा विद्यापीठ (कर्नाटक)



अर्जुन टाकळकर





समारोपाच्या समारंभात केरळ येथील कृष्णा विद्यापीठाचा संघ. या कलागुणांना सयाजी शिंदे यांची दाद मिळाली.

# इच्छाशक्तीने गाठा ध्येय

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

'आपल्याला कोणत्या क्षेत्रात करिअर करायचे आहे, याची दिशा कॉलेज जीवनात ठरते. त्यासाठी मनातील निश्चित इतरांना न सांगता टार्गेट फिक्स करा. आपल्या अंगभूत कलागुण आणि इच्छाशक्तीच्या बळावर हळुवारपणे मार्गक्रमण करताना कधी अपयश आले, तर खचून जाऊ नका', असा मौलिक सल्ला प्रसिद्ध अभिनेते सयाजी शिंदे यांनी तरुणाईला मंगळवारी दिला. युवा महोत्सवाच्या बक्षिस वितरण प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे होते. लोककला केंद्रात विद्यार्थ्यांच्या जल्लोषात बक्षिस वितरण झाले.

अभिनेते शिंदे यांनी पारंपरिक शैलीत भाषण करण्यापेक्षा थेट युवकांशी संवाद साधला. त्यांचा संघर्षमय प्रवास, सामाजिक उपक्रम, मराठी चित्रपटसृष्टीसह हॉलीवूड, टॉलीवूडमधील प्रवासातील आठवणींमुळे त्यांचा संवाद उत्तरोत्तर रंगतदार होत गेला. 'पदवीच्या प्रथम व द्वितीय वर्षात असताना मी सुरक्षारक्षक म्हणून काम करत होतो. त्याचवेळी अभिनेता व्हायचे ठरवले आणि त्याच दिशेने वाटचाल केली. वयाच्या २० व्या वर्षी धडपड केली, तेव्हा कुठे ४० व्या वर्षी यश लाभले. त्यामळे यशाकडे मार्गक्रमण करताना हळुवार करा, म्हणजे धोका कमी असतो. दादरच्या फुटपाथवर अभिनय साधना पुस्तकाने करिअरचा मार्ग दाखवणारे ठरले. आयुष्यात लहान-मोठा, गरीब-श्रीमंत असे काहीच नसते. आई आणि वृक्ष दोनच गोष्टी महत्त्वाच्या असतात. एक जन्म देते आणि दुसरे श्वास. या दोनी गोष्टींची उतराई कोणत्याही पद्धतीने शक्य नाही' असे शिंदे यांनी सांगितले.

**अभिनेते सयाजी शिंदे यांचा विद्यार्थ्यांना सल्ला**

जिल्हाधिकारी डॉ. अमित सैनी म्हणाले, 'विद्यार्थ्यांनी अंगभूत गुण पुढे आयुष्यभर जोपासावेत, त्यांचा विकास करावा. आपले कलागुण कधीही हरवू देऊ नका.' डॉ. सैनी यांनी अभिनेते शिंदे यांच्या माण, खटाव तालुक्यांतील वृक्षसंवर्धनाच्या कार्यक्रमाचे कौतुक केले.

अध्यक्षीय भाषणात प्रभारी कुलगुरू डॉ. मोरे यांनी संयोजनात मोलाचे सहकार्य करणाऱ्या सर्व घटकांचे आभार मानले. एआययूचे निरीक्षक प्रा. एस. के. शर्मा, मुंबई विद्यापीठाचे नीलेश सावेकर यांची भाषणे झाली. क्रीडा विभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, विवेकानंद संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. अभयकुमार साळुंखे, भारती विद्यापीठाचे डॉ. हणमंतराव कदम, ग्रंथपाल डॉ. नमिता खोत, डॉ. डी. के. गायकवाड उपस्थित होते. विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी अहवाल वाचन केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी प्रास्ताविक केले. परीक्षा नियंत्रक महेश काकडे यांनी आभार मानले.

### सेल्फीची लखलख

बक्षिस समारंभास प्रसिद्ध अभिनेते सयाजी शिंदे उपस्थित राहणार असल्याने सकाळपासून लोककला केंद्र विद्यार्थ्यांच्या उपस्थितीने हाऊसफुल्ल झाले होते. साडेआकरा वाजता अभिनेते शिंदे यांची एन्ट्री होताच युवकांनी जल्लोष केला. ते व्हीआयपी कक्षात स्थानापन्न झाल्यानंतर अनेक विद्यार्थ्यांनी त्यांच्यासोबत सेल्फी घेतली. बक्षिस वितरणावेळीही विजेत्या संघांनाही हा मोह आवरता आला नाही.

## नमस्कार कोल्हापूरकर

तेजस युनिव्हर्सिटीच्या संघव्यवस्थापक भुपाली कश्यप यांनी केवळ चार दिवसात मराठी भाषा आत्मसात केल्याचे दाखवून दिले. मनोगताला उभे राहताच 'नमस्कार कोल्हापूरकर' अशी साद त्याने घालताच, एकच कल्ला झाला. त्यांनी कॅम्पसमधील हिरवाई टिकऊन ठेवण्याचे आवाहन केले. स्पर्धेच्या निमित्ताने आलेल्या सर्व आठवणींचा ठेवा जवळ ठेवून मार्गक्रमण करणार असल्याचे सांगून त्यांनी उत्कृष्ट नियोजनाबद्दल संयोजकांना दिलखुलास अभिनंदन केले.



## कोल्हापुरकरांचे आदरतिथ्य

यापूर्वी महोत्सवात पाच विभागातून केवळ विजेत्या, उपविजेत्या संघांना प्रतिनिधीत्व करण्याची संधी मिळत होती. यावर्षी प्रथमच एआययूने स्पर्धेच्या निकषात बदल करत पहिल्या तीन संघांना प्रतिनिधीत्व करण्याची संधी दिली. त्यामुळे विद्यार्थ्यांची संख्या दीड हजारवर गेली. सर्व विद्यार्थ्यांची निवास व भोजनाची व्यवस्था उत्कृष्ट पद्धतीने केली होती. स्पर्धेतील सहभागानंतर परराज्यातील विद्यार्थ्यांनी कोल्हापूर शहराची सफर केली. विद्यापीठातील व्यवस्था आणि शहर पर्यटनादरम्यान आदरतिथ्याचा चांगला अनुभव आल्याचे अनेक विद्यार्थ्यांनी सांगितले.

# कोई भी अमीर-गरीब नहीं होता...

## अभिनेते सयाजी शिंदे यांचा विद्यार्थ्यांना कानमंत्र

- 'शिवोत्सव' राष्ट्रीय यूथ महोत्सवाची सांगता
- विद्यार्थ्यांचे संघ दुपारनंतर रवाना




**कोल्हापूर : 'शिवोत्सव' राष्ट्रीय युवा महोत्सवात मंगळवारी समारोप कार्यक्रमात शिवाजी विद्यापीठाच्या लोककला केंद्राच्या खुल्या सभागृहात विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधताना अभिनेते सयाजी शिंदे. यावेळी व्यासपीठावर जिल्हाधिकारी डॉ. अमित सैनी, प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे, अभयकुमार साळुंखे, हणमंतराव कदम आदींसह मान्यवर. (छाया : तय्यब अली)**

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

जगात सर्वात चांगली भाषा ही मातृभाषा असते. पायलट आणि बैलगाडीवान यांचे महत्त्व एकसारखेच आहे. स्पर्धा स्वत:शीच करा. कोई भी अमीर और गरीब नहीं होता. ये दिमाग का प्रॉब्लेम है. इच्छाशक्ती ही खरेदी करता येत नाही. त्यामुळे इच्छाशक्ती प्रबळ ठेवा. तसेच टॅलेंट विकत मिळत नाही. त्यामुळे सतत आपल्या क्षेत्रात ज्ञान वाढवत राहा. टॅलेंट आपल्याला यशस्वी बनवेलच, अशा दिलखुलास आणि प्रेरक शब्दांत नामवंत अभिनेते सयाजी शिंदे यांनी विद्यार्थ्यांशी खुला संवाद साधला.

'शिवोत्सव' राष्ट्रीय युवा महोत्सवाची मंगळवारी शानदार कार्यक्रमाने विजेत्या संघांना पारितोषक वितरणाने सांगता झाली. शिवाजी विद्यापीठाच्या लोककला केंद्राच्या खुल्या सभागृहात झालेल्या या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून अभिनेते शिंदे बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. अमित सैनी, प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे उपस्थित होते. अभिनेते शिंदे यांनी औपचारिक भाषण न करता थेट विद्यार्थ्यांशी मराठी, हिंदी,

पान २ वर

## सयाजी शिंदेंचा व्हॅलेंटाईन?

तुम्हाला कोणी प्रपोज केलं होतं का? या एका विद्यार्थ्यानं ऐन व्हॅलेंटाईन डे दिवशी टाकलेल्या गुगलीवर सयाजी शिंदे यांनी अगदी प्रामाणिक उत्तर दिलं. ते म्हणाले, कॉलेजला असताना एका मुलीनं तुम्ही आयुष्यात चांगले कलाकार होणार, असं सांगून प्रपोज केलं; पण मी मात्र नकार दिला होता. कारण, माझा आयुष्याशीच संघर्ष सुरू होता. त्यामुळे प्रेम करून काय करायचं. या उत्तरानंतर सभागृहात टाळ्यांचा कडकडाट झाला. दरम्यान, शिंदे यांनी त्यांच्या सातारा जिल्ह्यातील माण-खटाव तालुक्यांतील गावांमध्ये केलेल्या सामाजिक कार्याची क्लिप यावेळी दाखवण्यात आली. यासह त्यांच्या चित्रपटांतील काही दृश्ये दाखवण्यात आली.

# बहुविध संस्कृतीतून एकात्मतेचा संदेश

- 'शिवोत्सव' आंतरविद्यापीठ राष्ट्रीय युवा महोत्सव
- पाच दिवस युवकांच्या जिंदादिल कलेने गाजले

**कोल्हापूर : विजय पाटील**

कोल्हापूरची ओळख देशभर कलानगरी म्हणूनच आहे. मराठमोळ्या संस्कृतीची राजधानी असलेल्या या कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठात पाच दिवस 'शिवोत्सव' आंतरविद्यापीठ राष्ट्रीय युवा महोत्सव झाला. काश्मीरपासून आसामपर्यंत आणि पंजाबपासून कर्नाटकपर्यंतच्या लोकसंस्कृतीचे बहारदार सादरीकरण जिंदादिल तरुणाईने प्रचंड जोशात केले. कलानगरीतील रसिकांनीही प्रत्येक सादरीकरणाला मनसोक्त दाद दिली. अख्खा भारत विविध लोकसंस्कृतीच्या कलेच्या अंगाने रसिकांना अनुभवता आला. विविधतेतून एकतेचा संदेश देत देशाच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या तरुणांनी या महोत्सवाला यादगार बनवत श्रीमंती बहाल केली.

उत्साहाने ओतप्रोत भरलेल्या देशभरातील विविध राज्यांतील दीड हजार तरुणाईने प्रत्येक कलाप्रकार जीव ओतून सादर करण्याचा

**पान २ वर**

# कोई भी अमीर-गरीब नहीं होता...

**(पान १ वरून)** तेलगू, तमिळ, इंग्रजी अशा भाषांत मनमोकळा संवाद साधत त्यांना मोलाचे मार्गदर्शन करणे पसंत केले. यावेळी शिंदे यांना विद्यार्थ्यांनी चित्रपटात करिअर कसे करायचे, मी आकर्षक नाही, मी गरीब आहे , काय करू? अभिनय कसा चांगला करू? असे प्रश्न विचारले. या प्रश्नांचा संदर्भ घेत शिंदे यांनी शेरोशायरी, डायलॉग, कवितांचा वापर करत संवाद साधला. ते म्हणाले, जगात दोनच गोष्टी खऱ्या आहेत. एक आई आणि दुसरे झाड. झाडे लावा ते तुम्हाला फुकट ऑक्सीजन देऊन जगवतात. मलाही यूथ महोत्सवात सहभागी व्हावे, असे वाटते. यासाठी नापास का नाही झालो असंही मिश्किलपणे त्यांनी सांगितलं. मी खूप वर्षे थिएटर केलं आहे. वीस वर्षांच्या तपश्चर्येनंतर माझं करिअर सुरू झालं; पण विद्यार्थ्यांनी कॉलेजला असल्यापासूनच करिअर डिझाईन केलं पाहिजे. त्या दिशेने ज्ञान मिळवायला हवे. सतत ध्यास घ्यायला हवा. माझा प्रवास वॉचमनपासून इथपर्यंत झाला आहे. कोणावरही डिपेंड राहू नका. कारण, यश स्वत:मुळेच मिळते. नाहीतर सुनील गावस्करचा मुलगा केव्हाच भारतीय क्रिकेट संघाचा कॅप्टन म्हणून दिसला असता. दहा-बारा दिवस परिश्रम करून तुम्ही जिंकण्याच्या अपेक्षा बाळगू नका. किमान एका गोष्टीला पंधरा वर्षे तुमच्या आयुष्यातील दिल्यास तुम्ही यशस्वी होऊ शकाल, असा गुरुमंत्र ही त्यांनी दिला. काम करा पैसे मिळत जातील. आपण आपले तिथे बरे, आहोत तिथे खरे हे सूत्र कायम मनावर कोरून ठेवण्याचा सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

## एक दिन आप इंडिया को रिप्रेझेंट करोगे


सर्वच कलाकारांना शुभेच्छा देताना सयाजी शिंदे म्हणाले, ज्यांना कॉलेज जीवनात बक्षीसे मिळतात ते कदाचीत पुढे प्रयत्न न केल्याने गायब होतात. परंतू ज्यांना या काळात अपयश येते. ही मंडळी प्रयत्न करत राहिल्याने आयुष्यात यशस्वी ठरतात. यासाठी त्यांनी स्व:त:चे उदाहरण दिले. आप सब एक दिन इंडिया को रिप्रेझेंट करोगे अशा शुभेच्छा त्यांनी दिल्या. शिंदे यांनी विद्यार्थ्यांना आज भरपूर वेळ दिला. विद्यार्थ्यांनीही त्यांच्यासोबत फोटोसेशन केले. शिंदे यांच्या गावातील एका तरुणाने विनंती केल्यावर शिंदे यांनी त्याला तांबव्याचा विष्णूबाळा या चित्रपटातील डॉयलॉग बोलण्यास आयोजकांना सांगून वेळ दिला.


यावेळी जिल्हाधिकारी डॉ. सैनी म्हणाले, या महोत्सवातील सादरीकरण अप्रतिम आहे. तरुणाईने या महोत्सवातील आठवणी घेऊन जाव्यात. कारण, हे दिवस पुन्हा येणार नाहीत. आज व्हॅलेंटाईन डे असूनही 'रोज'कुठे दिसत नाहीत, असे त्यांनी विचारताच सभागृहात खसखस पिकली. तरुणांनी आपले टॅलेन्ट तसेच कायम ठेवावे, असे आवाहन त्यांनी केले. प्रभारी कुलगुरू डॉ. मोरे यांनी महोत्सवाच्या यशस्वीतेबद्दल सर्वांचे आभार मानले. यावेळी केरळ संघाच्या टीम मॅनेजर भूपाळी कश्यप यांनी मनोगत व्यक्त करताना कोल्हापूर हे खूप चांगल्या माणसांचे शहर असल्याचे सांगितले. इथली ग्रीनरी नॉर्थ इंडियासारखी आहे. कोल्हापुरी जेवण तिखट असल्याचे सांगत ते आवडल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीजचे निरीक्षक एस. के. शर्मा म्हणाले, सगळेच कलाकार जीवतोड मेहनत करून कला सादर करतात. मात्र, पारितोषिक काहींनाच मिळते. आम्ही सगळ्यांनाच काही ना काही देण्याचा प्रयत्न कोल्हापूरच्या पवित्रभूमीतून केला आहे. पुढील वर्षांपासून ग्रेड सीस्टीम चालू करावी, असा प्रस्ताव मी एआययूकडे पाठवणार आहे. तसेच विद्यापीठांनी विद्यार्थ्यांना डीए वाढवून द्यावा, अशी सूचना त्यांनी केली. प्रास्ताविक कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले. पाहुण्यांचे स्वागत विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात लोकनृत्यांच्या सादरीकरणाने झाली. यावेळी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष अभयकुमार साळुंखे, भारती विद्यापीठाचे हणमंतराव कदम, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, पी. टी. गायकवाड, डी. के. गायकवाड, ग्रंथपाल नमिता खोत आदींसह मान्यवर विद्यार्थी उपस्थित होते.

**विद्यार्थ्यांचे संघ परतले**

मागील पाच दिवसांपासून कोल्हापुरात आलेल्या देशभरातील विद्यापीठांचे संघ आज समारोपाच्या कार्यक्रमानंतर तत्काळ बॅगा भरून आपापल्या शहरांकडे रवाना झाल्याचे दिसून आले.



# बहुविध संस्कृतीतून एकात्मतेचा संदेश

(पान १ वरून) प्रयत्न केला. त्यामुळे चंदीगढ विद्यापीठाच्या संघाने सादर केलेल्या चार्ली चॅप्लिनच्या जीवनावरील नाटिकेवेळी प्रेक्षकांचे हसून पोट दुखत असतानाच डोळेही पाणावले. आदिवासी लोकनृत्यात गुजरातच्या संघाने सादर केलेल्या चित्तथरारक सादरीकरणाला सलग टाळ्यांची दाद मिळाली. शोभायात्रेपासून अगदी सांगता समारंभापर्यंत भारतातील सांस्कृतिक वैभव शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणात व्यापून राहिले होते. भाषा वेगळ्या, संस्कृती भिन्न आणि जेवणखानही निराळे. असे असतानाही देशभरातून आपापल्या संस्कृतीचे प्रतिनिधित्व करणारा यूथ सहजपणे सर्वत्र मिसळत होता. कलाकार युवतींचा वावर आत्मविश्वासपूर्ण होता. प्रत्येकाची कला परस्पर समजून घेताना दिसले. सादरीकरणाला दिलखुलास दाद देण्यातही ही मंडळी पुढे होती. त्यांच्यात खच्चून भरलेली ऊर्जा, अभिनयाचा अंदाज आणि प्रत्येक गोष्ट एन्जॉय करण्याची खिलाडू वृत्ती या मंडळींमध्ये सारखीच असल्याचे निरीक्षण येथे नोंदवावे असेच आहे. तरुणाई बिघडली. या पिढीचे काही खरे नाही, असे सहज बोलले जाते; परंतु भारतातील सगळ्या तरुणाईचे प्रतिनिधित्व करणाऱ्या या विद्यार्थ्यांना पाहिल्यावर हे विधान तकलादू आहे, असे वाटण्यासारखी स्थिती होती. कारण हे तरुण-तरुणी आपल्या करिअरच्या बाबतीत खूप फोकस्ड दिसली. जितके ते उत्साही होते. तितकीच नम्रता त्यांच्यात आढळली. एखाद्याने हरवलेले पाकीट त्यांना आणून दिलं. कुणाचा गहाळ झालेला मोबाईल त्यांच्या रूमवर नेऊन पोहचवण्यात आला. अशा सहज वाटणाऱ्या माणुसकीच्या गोष्टींना या विद्यार्थ्यांनी जाहीरपणे व्यासपीठावर आणलें कोल्हापुरी माणसं प्रामाणिक आहेत. न मागता मदतीस पुढे येतात, अशी शाबासकीची थाप त्यांनी भरभरून दिली. दीड हजार विद्यार्थ्यांचा सहभाग असणाऱ्या आणि विविध पंचवीस कलाप्रकारांतील ही स्पर्धा अप्रतिम अशीच पार पडली. 'हॅटस् ऑफ' असाच या तरुणाईचा कलाविष्कार होता. याला कारणही तसेच होते. ही मंडळी देशभरातील विद्यापीठातील झिस्ट होते. शिवाजी विद्यापीठाला यूथ फेस्टिव्हल आयोजनाचा मान आठ वर्षांनंतर दुसऱ्यांदा मिळाला. शिवाजी विद्यापीठानेही महोत्सवाच्या आयोजनाचे शिवधनुष्य चांगले पेलल्याचे दिसून आले. नेटके संयोजन आणि नियोजन दिसून आले; पण २६ कला प्रकारांपैकी यजमान शिवाजी विद्यापीठाचा सहभाग केवळ दोनच कलाप्रकारात सहभाग होता. यूथ महोत्सवाच्या उद्‌घाटनाला सचिन खेडेकर आणि समारोपास सयाजी शिंदे या कलाकारांना प्रमुख पाहुणे म्हणून बोलवण्यात आले होते. शिंदे हे मराठी, हिंदीमध्ये काम करतातच. त्याहीपेक्षा ते दाक्षिणात्य चित्रपटांतील लोकप्रिय कलाकार आहेत. खेडेकर हे हिंदी व मराठीतील दमदार कलाकार आहेत. या दोघांचा देशभर चाहतावर्ग असल्याने यूथ फेस्टिव्हलसाठी या मराठी कलाकारांची निवडही योग्य केली होती.


## कोल्हापूरचे पर्यायाने लोकसंस्कृतीचे ब्रँडिंग

या महोत्सवात कोल्हापूरबद्दल युवकांना विशेष आकर्षण असल्याचे दिसून आले. त्यामुळे ही मंडळी कोल्हापूरच्या गुणवैशिष्ट्यांची चर्चा करताना दिसत होते. मराठमोळ्या संस्कृतीचीही त्यांनी स्थानिक विद्यार्थ्यांकडून माहिती घेतली. महाराष्ट्रातील लोककला, खाद्यसंस्कृती यापासून पोवाडा, शाहिरी, गडकोटांची माहितीही त्यांनी या काळात घेण्याचा प्रयत्न केला. त्यामुळेच कोल्हापूरचे म्हणजेच पर्यायाने महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीचे ब्रँडिंग या निमित्ताने झाले.

94.3FM
Tomato
Ekdum Freshh..
नमस्कार मंडळी आजचा विषय
कोल्हापूर-सांगली रस्ता कधी पूर्ण होणार?
आपलं मत आपण कळवू शकता - सकाळी ८ ते १२
फोन : 0231-2525943

FORTUNE
CINEPLEX
ICHALKARANJI






कोल्हापूर : शिवोत्सवाच्या समारोपप्रसंगी आंध्र प्रदेशच्या कृष्णा विद्यापीठाच्या मुलींच्या संघाने लोकवाद्यवृंद सादर केले. दुसऱ्या छायाचित्रात रांगोळीतून कलाकृती रेखाटताना विद्यार्थी. तिसऱ्या छायाचित्रात समूहलोकनृत्य सादर करताना राजस्थानचा संघ.

# अंगभूत कला, इच्छाशक्तीच्या बळावर कारकीर्द घडवा

## अभिनेते सयाजी शिंदे यांचा तरुणांना संदेश : आंतरविद्यापीठ राष्ट्रीय युवा महोत्सवाचा समारोप

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

अंगभूत कलागुण आणि इच्छाशक्तीच्या बळावर कारकीर्द घडवा, असा सल्ला अभिनेते सयाजी शिंदे यांनी देशभरातील तरुणाईला दिला.

शिवाजी विद्यापीठात १० फेब्रुवारीपासून सुरू असलेल्या ३२ व्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ राष्ट्रीय युवा महोत्सवाचा समारोप व पुरस्कार वितरण समारंभ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत विद्यापीठाच्या लोककला केंद्रात झाला. जिल्हाधिकारी डॉ. अमित सैनी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे अध्यक्षस्थानी होते.

सयाजी शिंदे यांनी उपस्थित तरुणांशी प्रश्नोत्तराच्या माध्यमातून थेट संवाद साधला. साताऱ्यावरून मुंबईला संघर्ष करण्यासाठी जाताना खिशात वीस पैसे घेऊन गेलो होतो आणि परत येताना यशासोबत ते वीस पैसे तसेच सोबत घेऊन परतल्याची हृद्य आठवण सांगून सयाजी शिंदे यांनी उपस्थितांच्या काळजाला हात घातला. ते म्हणाले, एफवाय ते टीवाय या कालावधीत वॉचमनची नोकरी करत असतानाच मी अभिनेता व्हायचे ठरवले आणि त्याच दिशेने वाटचाल केली. वयाच्या विसाव्या वर्षी धडपड सुरु केली, तेव्हा कुठे चाळिसाव्या वर्षी यश लाभल्याचे त्यांनी सांगितले. दादरच्या फूटपाथवर 'अभिनय साधना' हे अवघ्या २२ रुपयांचे पुस्तक आपल्या करिअरला मार्ग दाखवणारे ठरल्याचे त्यांनी सांगितले.

ते म्हणाले, विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन जीवनातच आपले लक्ष्य निर्धारित करावे. ते आपल्या मनात निश्चित ठेवून कोणालाही न सांगता हळूहळू त्या दिशेने वाटचाल करावी. महाविद्यालय ही केवळ एक पहिली पायरी आहे. जीवनात अशा असंख्य पायऱ्या आपल्याला चढायच्या आहेत. आज तुम्ही आपल्या विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करत आहात, उद्या जागतिक स्तरावर आपल्या देशाचे प्रतिनिधित्व करा. आई आणि वृक्ष या दोनच गोष्टी महत्त्वाच्या असतात. एक जन्म देते आणि दुसरे श्वास देते. या दोन्ही गोष्टींची उतराई कोणत्याही पद्धतीने शक्य नसल्याचेही सयाजी शिंदे म्हणाले.



कोल्हापूर : शिवोत्सवाच्या समारोपप्रसंगी बोलताना अभिनेते सयाजी शिंदे. सोबत जिल्हाधिकारी डॉ. अमित सैनी, प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आदी. (सर्व छाया : एस. अली)

जिल्हाधिकारी डॉ. अमित सैनी म्हणाले, विद्यार्थ्यांनी आपल्यातले अंगभूत गुण पुढे आयुष्यभर जोपासावेत, त्यांचा विकास करावा. आपले कलागुण कधीही हरपू देऊ नका, असा सल्ला दिला.

अध्यक्षीय भाषणात प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे यांनी राष्ट्रीय युवा महोत्सवाच्या संयोजनात मोलाचे सहकार्य करणाऱ्या सर्व घटकांचे आभार मानले. देशभरातून विद्यापीठात दाखल झालेले विद्यार्थी कोल्हापूर आणि विद्यापीठाबद्दल चांगल्या आठवणी येथून सोबत घेऊन जातील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी महोत्सवाचा अहवाल सादर केला. नोंद झालेल्या एकूण ८२ विद्यापीठांपैकी ७९ विद्यापीठांचे संघ स्पर्धेत सहभागी झाले. ८७० विद्यार्थी, ५४२ विद्यार्थिनींसह संघ व्यवस्थापक, परीक्षक आदी असे सुमारे १५०० लोक विद्यापीठात दाखल झाले. कोणत्याही राष्ट्रीय स्पर्धेच्या तुलनेत सहभागी विद्यापीठे आणि स्पर्धक या दोहोंची संख्या यंदा विक्रमी असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी विद्यापीठास या महोत्सवाच्या संयोजनात आर्थिक साहाय्य करणारी महाविद्यालये व शिक्षण संस्थांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये भारती विद्यापीठ, कोल्हापूर, रयत शिक्षण संस्था, सातारा, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, कोल्हापूर, राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, साखराळे, डीकेटीई, इचलकरंजी, जे. जे. मगदूम महाविद्यालय, जयसिंगपूर, आर्टस् अॅन्ड कॉमर्स महाविद्यालय, सातारा, जनता शिक्षण संस्था, आजरा यांचा समावेश होता.

कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. परीक्षा नियंत्रक महेश काकडे यांनी आभार मानले. व्यासपीठावर डॉ. अभयकुमार साळुंखे, डॉ. हणमंतराव कदम, डॉ. पी. टी. गायकवाड, डॉ. नमिता खोत, डॉ. डी. के. गायकवाड यांच्यासह संयोजन समितीचे सदस्य उपस्थित होते.

प्रारंभी मान्यवरांसाठी युवा महोत्सवात सहभागी झालेल्या निवडक संघांचे चित्ताकर्षक सादरीकरण झाले. यामध्ये लव्हली प्रोफेशनल विद्यापीठ, पंजाबच्या संघाने पाश्चिमात्य समूहगीत, बनस्थळी विद्यापीठ, राजस्थानच्या संघाने समूह लोकनृत्य, आय. के. गुजराल पंजाब टेक्निकल विद्यापीठ, जालंधरचा विद्यार्थी गुरप्रीत सिंग याने मिमिक्री, तर आंध्र प्रदेशच्या कृष्णा विद्यापीठाच्या मुलींच्या संघाने लोकवाद्यवृंद सादर केला.

### हे आदरातिथ्य विसरू शकरणार नाही

समारोप समारंभात तेजपूर विद्यापीठाच्या संघ व्यवस्थापक भूपाली कश्यप आणि मुंबई विद्यापीठाचे नीलेश सावेकर यांनी कोल्हापुरी लोक, त्यांचे आदरातिथ्य, इथली परंपरा, विद्यापीठातील हिरवाई, राष्ट्रीय पक्ष्याचे पदोपदी होणारे दर्शन, उत्स्फूर्तपणे दाद देणारे प्रेक्षक आणि बाजरीची भाकरी आपण कधीही विसरू शकणार नाही, अशी प्रतिक्रिया व्यक्त केली.

# शिवोत्सवावर महाराष्ट्राची मोहोर

## मुंबईला विजेतेपद; नागपूर विद्यापीठास उपविजेतेपद

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणात गेल्या १० फेब्रुवारीपासून रंगलेल्या ३२ व्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ राष्ट्रीय युवा महोत्सव अर्थात 'शिवोत्सव-२०१७'मध्ये मुंबई विद्यापीठाने सर्वसाधारण विजेतेपद, तर नागपूरच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाने उपविजेतेपद पटकावून महोत्सवावर महाराष्ट्राची मोहोर उमटवली. अमृसरच्या गुरुनानक देव विद्यापीठाने तृतीय, तर पंजाबच्या लव्हली प्रोफेशनल विद्यापीठाने चतुर्थ क्रमांक पटकावला.

शिवाजी विद्यापीठाने शोभायात्रेत चतुर्थ क्रमांकासह सहभाग नोंदविलेल्या स्पॉट फोटोग्राफी व मूक अभिनय या दोन्ही प्रकारांत अनुक्रमे प्रथम व चतुर्थ क्रमांक पटकावला. शोभायात्रेमध्ये आंध्र प्रदेशच्या कृष्णा विद्यापीठाचा प्रथम, आसामच्या गुवाहाटी विद्यापीठाचा द्वितीय, तर कुरुक्षेत्र विद्यापीठाचा तृतीय क्रमांक आला. कोल्हापूरचे शिवाजी विद्यापीठ आणि कर्नाटकचे म्हैसूर विद्यापीठ यांना चतुर्थ क्रमांक विभागून देण्यात आला. अभिनेते सयाजी शिंदे यांच्या हस्ते व कोल्हापूरचे जिल्हाधिकारी डॉ. अमित सैनी यांच्या प्रमुख उपस्थितीत पुरस्कार वितरण करण्यात आले. शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, भारतीय विद्यापीठ महासंघाचे सहसचिव डॉ. डेव्हिड सॅम्पसन, निरीक्षक डॉ. एस. के. शर्मा उपस्थित होते.

यावेळी राष्ट्रीय युवा महोत्सवामध्ये झालेल्या कलाप्रकारनिहाय निकालही घोषित करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड यांनी निकाल घोषित केले.

### गटनिहाय विजेते, उपविजेते विद्यापीठ

- **संगीत : गुरुनानक देव विद्यापीठ, अमृतसर, मुंबई विद्यापीठ, मुंबई**
- **नृत्य : मणिपूर विद्यापीठ, मणिपूर, कुरुक्षेत्र विद्यापीठ, ठाणेसर, हरियाणा**
- **साहित्य : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर, गुवाहाटी विद्यापीठ, आसाम**
- **नाट्य : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, एसएनडीटी महिला विद्यापीठ, मुंबई**
- **ललितकला : मुंबई विद्यापीठ, मुंबई, गुलबर्गा विद्यापीठ, कर्नाटक**



**कोल्हापूर : स्पर्धेचा सर्वसाधारण विजेता मुंबई विद्यापीठाचा संघ.** (छाया : एस. अली)




कोल्हापूर : 'शिवोत्सव' युवा महोत्सवात सर्वसाधारण विजेतेपद पटकाविणाऱ्या मुंबई विद्यापीठाला चषक देताना प्रसिद्ध अभिनेते सयाजी शिंदे. शेजारी बीसीयूडीचे संचालक डॉ. डी. आर. मोरे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी डॉ. अजित चौगुले, डॉ. सॅम्पसन डेव्हिड, डॉ. एस. के. शर्मा आदी.

(बी. डी. चेचर : सकाळ छायाचित्रसेवा)

(बी. डी. चेचर : सकाळ छायाचित्रसेवा)

# मुंबई विद्यापीठाला विजेतेपद

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाला उपविजेतेपद

कोल्हापूर, ता. १४ : शिवाजी विद्यापीठामध्ये झालेल्या ३२ व्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ राष्ट्रीय 'शिवोत्सव २०१७' युवा महोत्सवात मुंबई विद्यापीठाने सर्वसाधारण विजेतेपद, तर नागपूरच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाने उपविजेतेपद पटकावले. अमृतसरचे गुरुनानक देव विद्यापीठ तिसरे आले.

गतवर्षी दुसरा क्रमांक पटकावणाऱ्या पंजाबच्या लव्हली प्रोफेशनल विद्यापीठाला चौथ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले. दरम्यान, शिवाजी विद्यापीठाने शोभायात्रेमध्ये चौथा, स्पॉट फोटोग्राफीमध्ये प्रथम, तर मूकनाट्यात चौथा क्रमांक पटकावला.




शोभायात्रेत आंध्र प्रदेशच्या कृष्णा विद्यापीठाचा प्रथम, आसामच्या गुवाहाटी विद्यापीठाचा द्वितीय, तर कुरुक्षेत्र विद्यापीठाचा तिसरा क्रमांक आला. शिवाजी विद्यापीठ व कर्नाटकच्या म्हैसूर विद्यापीठाला विभागून चौथा क्रमांक देण्यात आला. गटनिहाय अनुक्रमे विजेते, उपविजेते असे : संगीत - गुरुनानक देव विद्यापीठ (अमृतसर), मुंबई विद्यापीठ. नृत्य - मणिपूर विद्यापीठ, कुरुक्षेत्र विद्यापीठ (हरियाना). साहित्य - राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ (नागपूर), गुवाहाटी विद्यापीठ (आसाम), नाट्य - डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ (औरंगाबाद), एसएनडीटी महिला विद्यापीठ (मुंबई). ललितकला - मुंबई विद्यापीठ, गुलबर्गा विद्यापीठ (कर्नाटक). राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड यांनी निकाल जाहीर केला.

### विभागून क्रमांक

**सुमारे २६ कला प्रकारांत महोत्सव झाला. प्रत्येक प्रकारांत विद्यार्थ्यांनी दाखविलेल्या टॅलेंटमुळे परीक्षक अवाक् झाले. त्यामुळे त्यांनी विभागून क्रमांक देऊन विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. क्लासिकल व्होकलमध्ये सहा विद्यापीठांना विभागून तिसरा क्रमांक देण्यात आला. अन्य प्रकारांत सर्वसाधारण अशीच स्थिती राहिली.**










कोल्हापूर : शिवोत्सव-२०१७ युवा महोत्सवात मंगळवारी उपविजेता नागपूरचे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ संघ प्रसिद्ध अभिनेते सयाजी शिंदे यांच्याकडून चषक स्वीकारताना. दुसऱ्या छायाचित्रात तृतीय क्रमांक विजेता अमृतसरच्या गुरुनानकदेव विद्यापीठाचे संघ व्यवस्थापक यांना चषक देताना सयाजी शिंदे. तिसऱ्या छायाचित्रात चौथा क्रमांक मिळविलेल्या पंजाबमधील लव्हली प्रोफेशनल विद्यापीठ संघाला चषक देताना सयाजी शिंदे.

# टॅलेंटेड विद्यार्थ्यांना करिअरचे आकाश खुले


## सयाजी शिंदे : 'शिवोत्सव-२०१७'मध्ये मुंबई विद्यापीठ सर्वसाधारण विजेतेपदाचे मानकरी

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १४ : ''महाविद्यालयीन जीवनातच करिअरचे टार्गेट ठरवून टाका. काय करणार आहोत, ते मात्र कुणाला सांगू नका. ज्याच्याकडे टॅलेंट आहे, त्याच्या करिअरसाठी आकाश मोकळे आहे. बुद्धिमत्ता व इच्छाशक्तीसाठी पैशाची गरज नाही. गरीब-श्रीमंत ही डोक्यातील समस्या असून तुम्ही स्वत:शीच स्पर्धा करायला शिका,'' अशी ऊर्जात्मक पेरणा प्रसिद्ध अभिनेता सयाजी शिंदे यांनी विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण केली.

प्रश्नोत्तरातून विद्यार्थ्यांशी संवाद साधत महाविद्यालय ही तर पायरी आहे. जीवनाची शाळा मोठी आहे असून खुल्या जगात जगायला शिका, म्हणजे एक दिवस तुमचाही असेल, असा सल्लाही त्यांनी दिला.

शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजित ३२ व्या आंतरविद्यापीठ राष्ट्रीय 'शिवोत्सव २०१७' महोत्सवाच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. त्यांच्याच हस्ते महोत्सवात सर्वसाधारण विजेता ठरलेल्या मुंबई




विद्यापीठ, उपविजेता नागपूरच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, तृतीय अमृतसरच्या गुरूनानक देव विद्यापीठ व चौथा ठरलेल्या पंजाबच्या लव्हली प्रोफेशनल विद्यापीठाला चषक देऊन गौरविण्यात आले. बीसीयूडीचे संचालक डॉ. डी. आर. मोरे अध्यक्षस्थानी होते. लोककला केंद्रात महोत्सवाचा जल्लोषात समारोप झाला.

श्री. शिंदे म्हणाले, ''जेथे आहात तेथे थांबू नका. तुमचे टार्गेट ठरवून सावकाश त्या दिशेने चालत राहा. गतीने जाण्याचा प्रयत्न कराल तर पडण्याची शक्यता आहे. तुमच्या पंखात जेवढे बळ असते तेवढेच तुम्ही उडू शकता. जीवनात लहान-मोठे असे काही असत नाही. स्वत:तील क्षमता वाढवायला शिका. आई व वृक्ष या आयुष्यातील दोन महत्त्वाच्या गोष्टी आहेत. आईला आपण कधीच काही परत करत नाही, तर वृक्षांकडून ऑक्सिजन घेत राहतो; पण आपल्याला वृक्षांची किंमत कळत नाही.'' ते म्हणाले, ''विमानातील पायलटप्रमाणे बैलगाडी चालविणाराही महत्त्वाचा आहे. आपण कधी कोणाकडे काम मागायला जायचे नाही, त्यासाठी कसे लायक होऊ, यासाठी प्रयत्न करत राहायचा. ज्यांना महोत्सवात बक्षीस मिळणार नाही त्यांना आयुष्यात मोठं होण्याच्या संधी खूप आहेत. खोट्याचा आधार कधी घेऊ नका. जर यश मिळत नसेल, तर तुम्ही चाईट लोकांच्या संगतीत आहात, हे समजून घ्या.'' जिल्हाधिकारी डॉ. अमित सैनी म्हणाले, ''पत्नीसमवेत महोत्सव पाहायला यायला हवे होते. कार्यक्रमाचा आस्वाद घेता आला असता; मात्र कलाकारांचा परफॉर्मन्स पाहून त्यांचा प्रोफेशनॅलिझम ग्रेट वाटला. यापुढेही विद्यापीठातून ज्ञान संपादन करून तुमचे टॅलेंट झळकवत राहा.'' असोसिएशन ऑफ इंडियाचे निरीक्षक एस. के. शर्मा यांनी प्रत्येक कलाकाराला टीएडीए सुमारे पाचशे रुपये द्यायला हवा, अशी सूचना करत महोत्सवात ग्रेडिंग सिस्टिमचा प्रस्ताव मांडणार असल्याचे स्पष्ट केले.

विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी महोत्सवाचा आढावा घेतला. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी प्रास्ताविक केले. परीक्षा नियंत्रक महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी डॉ. अजित चौगुले, भारतीय विद्यापीठ महासंघाचे सहसचिव डॉ. सॅम्पसन डेव्हिड, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, डॉ. एच. एम. कदम, राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, ग्रंथपाल डॉ. नमिता खोत उपस्थित होते.



**कोल्हापूर : शिवोत्सव-२०१७ युवा महोत्सवात लोककला केंद्रामधील उपस्थितांशी संवाद साधताना प्रसिद्ध अभिनेते सयाजी शिंदे.**

(बी. डी. चेचर : सकाळ छायाचित्रसेवा)

### सयाजी शिंदे सांगतात...

- **महोत्सवातील जल्लोष पाहिल्यानंतर मी फेल होण्याऐवजी पास का झालो? असे वाटते. तसे झाले असते तर पुन्हा ॲडमिशन घेऊन महोत्सवात सहभागी होऊ शकलो असतो.**
- **एफवाय ते टीवाय वॉचमन म्हणून काम करताना कोल्हापूरला स्पर्धेनिमित्त आलो होतो. खिशात वीस पैसे होते. ते तसेच परत घेऊन गेलो होतो.**
- **यशस्वितेसाठी पंधरा वर्षांचा अभ्यास महत्त्वाचा आहे. मी एकांकिकेत बक्षीस मिळविल्यानंतर बाकीचे चांगले नव्हते म्हणून तुला बक्षीस मिळाले आहे, असा माझा उपहास केला गेला होता.**
- **मातृभाषा मोलाची असून कमी शब्दांत जादा आशय मांडायला शिका. स्क्रिप्टमधील शब्दांचे अर्थ समजूनच मी चार प्रकारांत अभिनय कसा करता येईल, हे ठरवून घेतो.**

## संवाद आणि अभिनय

श्री. शिंदे यांनी स्टेजवर मंगेश या विद्यार्थ्याला बोलावून 'तांबव्याचा विष्णू बाळा'मधील डायलॉग म्हणण्यास सांगितले होते. त्याने सादर केलेला डायलॉग टाळ्यांची दाद घेणारा ठरला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील विद्यार्थ्याला त्यांनी चक्क स्टेजवर बोलावून अभिनय करण्यास सांगितले तसेच त्याला अभिनयात बोलायचे कसे, याच्या टिप्सही दिल्या. आंध्र प्रदेशमधील कृष्णा विद्यापीठाने फोक ऑर्केस्ट्राचे भन्नाट सादरीकरण केल्यानंतर ते स्टेजवर गेले. त्यांच्यासमवेत विद्यार्थ्यांनी छायाचित्र टिपत आपली आठवण कॅमेऱ्यात बंदिस्त केली.

## लघुपटाचे प्रदर्शन

श्री. शिंदे यांनी सातारा जिल्ह्यातील माण तालुक्यात वृक्षसंवर्धनासाठी चालवलेल्या चळवळीचा लघुपट दाखविण्यात आला. त्यांच्या कार्यास उपस्थितांनी दाद दिली. कार्यक्रमावेळी त्यांच्यासमवेत सेल्फी घेण्याचा मोह अनेकांना आवरता आला नाही.

## विद्यापीठाचे कौतुक

तेजपूर विद्यापीठातील प्रा. धुपाली कश्यप यांनी कोल्हापूर शहर व विद्यापीठ कॅम्पसची भरभरून स्तुती केली. राष्ट्रीय पक्षी मोर कॅम्पसमध्ये पाहण्याचा अनुभव घेता आल्याचे सांगितले. मुंबई विद्यापीठातील डॉ. नीलेश सावे यांनी शिवाजी विद्यापीठाने उत्कृष्ट पद्धतीने महोत्सवाचे आयोजन केल्याचे स्पष्ट केले.

## टॅलेंट खरेदी करता नाही

क्रिकेटपटू सुनील गावसकर यांचा मुलगा कॅप्टन झाला नाही. याचा अर्थ आपल्या करिअरमध्ये आपला बापसुद्धा सपोर्ट करू शकत नाही. 'टॅलेंट' व 'विल पॉवर' खरेदी करता येत नाही. त्यामुळे स्वत:ला सिद्ध करणे, हाच योग्य पर्याय असल्याचे श्री. शिंदे यांनी सांगितले.